विषय:- पारनेर नगरपंचायत, [redacted](जिल्हा- अहमदनगर)
**वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान- ठोक तरतूद योजने अंतर्गत सन २०२०-२०२१ या वर्षातील कामांच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरीबाबत...**

वाचा :- १) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण/१०२००/प्र.क्र.४०/२०००/नवि-४, दि.२५/०२/२०००
२) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.धोरण २०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि.१७/११/२०१७
३) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक- नपावै- २०१७/प्र.क्र.१७२(९८)/नवि-१६, दि.२०/११/२०१७
४) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक- धोरण- २०१७/प्र.क्र.१७१/नवि-1६, दि.३०/०९/२०२०
५) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- नपावै-२०२१/प्र.क्र.२१०(५)/नवि-१६, दि.०३/११/२०२१
६) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- नपावै-२०२१/प्र.क्र.२१०(५)/नवि-१६दि.०४/०१/२०२२
७) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- नपावै-२०२१/प्र.क्र.२१०(५)/नवि-१६दि. २४/०२/२०२२
८)महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण –१११८/प्र.क्र.३०/नवि-०४ दि.२८/०३/२०२२
९)कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचे कार्यालयाकडील प्रस्ताव जा.क्र.प्रशा – १/३८१३/सन २०२२ दि.१०/०६/२०२२
१०)कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेश जा.क्र./प्र.शा- ३३३७/१३,०२,०३,०८,०९,१६,१०,१७,०७,१२ दि.२५/०५/२०२२

**क्र.नपा/कार्या- ४ /वशि.१४८२/ २०२२ आदेश दि. ~~/०७/२०२२~~ 29/07/2022**

ज्याअर्थी, संदर्भ क्र. ५ ते ७ चे शासन निर्णय अन्वये शासनाच्या नगरपालिकांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान - ठोक तरतूद लेखाशीर्ष (४२१७ ०६०३) योजनेअंतर्गत पारनेर नगरपंचायतीला सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षांत खालीलप्रमाणे एकूण ११ कामांस एकूण रक्कम रु.३.०० कोटी इतके अनुदान प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अनुदान प्राप्त रक्कम |
|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र.14 मधील पानोली रोड ते लमाणबाबा मंदिर रस्ता कॉन्क्रीटीकरण करणे | रु.60,00,000/- |
| 2 | प्रभाग क्र.3 मधील लोणी रस्ता ते ठोंबरे वस्ती रस्ता करणे | रु.32,00,000/- |

| | | |
|---|---|---|
| 3 | प्रभाग क्र.3 मधील जामगाव रस्ता ते महाजन मळा रस्ता करणे | रु.25,00,000/- |
| 4 | प्रभाग क्र.5 मधील कान्हूर रस्ता ते आढाव वस्ती रस्ता करणे | रु.25,00,000/- |
| 5 | प्रभाग क्र.5 मधील भाऊ औटी ते मधूकर औटी यांच्या रस्ता घरापर्यंत करणे | रु.50,00,000/- |
| 6 | प्रभाग क्र. 6 मधील पेट्रोल पंप ते औटी वस्ती रस्ता डांबरीकरण करणे | रु.20,00,000/- |
| 7 | प्रभाग क्र. 6 मधील पुणेवाडी फाटा ते चेडे वस्ती रस्ता करणे | रु.12,00,000/- |
| 8 | प्रभाग क्र. 6 मधील अप्पा औटी चौक ते भिसे वस्ती रोड डांबरीकरण करणे | रु.12,00,000/- |
| 9 | प्रभाग क्र.12 मधील पारनेरकर महाराज सभागृह ते नागेश्वर मंदिर रस्ता कॉन्क्रीटीकरण करणे | रु.20,00,000/- |
| 10 | प्रभाग क्र.7 मधील मनर्णिक विहीर ते शनी मंदिर (वरची वेस) रस्ता कॉन्क्रीटीकरण करणे | रु.25,00,000/- |
| 11 | प्रभाग क्र.1 मधील कान्हूर रोड ते कुंभारदरा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे | रु.19,00,000/- |
| **एकूण** | | **रु.**3,00,00,000/- |

ज्याअर्थी, वाचा क्र.०९ नुसार कामास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्तावाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **कामाचे नाव** | **शासन निर्णयाप्रमाणे अनुदान प्राप्त रक्कम** | **प्रशासकीय मान्यता द्यावयाची रक्कम** |
|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र.14 मधील पानोली रोड ते लमाणबाबा मंदिर रस्ता कॉन्क्रीटीकरण करणे | रु. 60,00,000/- | रु. 59,99,850/- |
| 2 | प्रभाग क्र.3 मधील लोणी रस्ता ते ठोंबरे वस्ती रस्ता करणे | रु. 32,00,000/- | रु. 31,99,853/- |
| 3 | प्रभाग क्र.3 मधील जामगाव रस्ता ते महाजन मळा रस्ता करणे | रु. 25,00,000/- | रु. 24,99,414/- |
| 4 | प्रभाग क्र.5 मधील भाऊ औटी ते मधूकर औटी यांच्या रस्ता घरापर्यंत करणे | रु. 50,00,000/- | रु. 49,98,521/- |
| 5 | प्रभाग क्र. 6 मधील पेट्रोल पंप ते औटी वस्ती रस्ता डांबरीकरण करणे | रु. 20,00,000/- | रु. 19,99,960/- |
| 6 | प्रभाग क्र. 6 मधील अप्पा औटी चौक ते भिसे वस्ती रोड डांबरीकरण करणे | रु. 12,00,000/- | रु. 11,99,807/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | प्रभाग क्र. 6 मधील पुणेवाडी फाटा ते चेडे वस्ती रस्ता करणे | रु. 12,00,000/- | रु. 11,97,982/- |
| 8 | प्रभाग क्र.1 मधील कान्हूर रोड ते कुंभारदरा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे | रु. 19,00,000/- | रु. 18,99,921/- |
| 9 | प्रभाग क्र.5 मधील कान्हूर रस्ता ते आढाव वस्ती रस्ता करणे | रु. 25,00,000/- | रु. 24,99,985/- |
| 10 | प्रभाग क्र.12 मधील पारनेरकर महाराज सभागृह ते नागेश्वर मंदिर रस्ता कॉन्क्रीटीकरण करणे | रु. 20,00,000/- | रु. 19,99,774/- |
| एकूण | | रु. 2,75,00,000/- | रु. 2,74,95,067/- |

ज्याअर्थी सदर कामांना सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांनी वाचा क्र. १० नुसार तांत्रिक मंजूरी दिलेली आहे.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी अहमदनगर, मला महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.धोरण २०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि.१७/११/२०१७ तसेच महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक-धोरण- २०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि.३०/०९/२०२०अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून सदरील कामाची कार्यन्वयन यंत्रणा " सार्वजनिक बांधकाम विभागास" **रु.२,७४,९५,०६७/-** इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता खालील अटी व शर्तींवर प्रदान करीत आहे.

जिल्हाधिकारी अहमदनगर
सत्यमेव जयते

(डॉ. राजेन्द्र ब. भोसले)
**जिल्हाधिकारी अहमदनगर**

**अटी व शर्ती:**

1) प्राप्त अनुदानापेक्षा जास्त होणारा खर्च नगरपरिषद निधीतून करणेत यावा.
2) निधी खर्च झालेनंतर विनियोग प्रमाणपत्र या कार्यालयास व शासनास सादर करावे.
3) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-धोरण-2017/प्र.क्र.171/नवि-16, दि.17/11/2017 मधील तरतुदींचेपालनकरावे.
4) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 मधील तरतुदींचे पालन करावे.
5) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता, 2013 मधील तरतुदींचे पालन करावे.
6) नगरपालिका प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्र.36 व 37चे तंतोतंत पालन करावे.
7) सदर प्रकल्पांतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरूप सार्वजनिक असावे,तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करावी.
8) कुठल्याही खाजगी स्वरूपाच्या कामांना मान्यता देणेत आली नसल्याची खातरजमा करावी.
9) हाती घ्यावयाची कामे सर्वसाधारणपणे नागरिकांच्या ठळकपणे लक्षात येतील किंवा नागरिकांना त्या कामांचा बोध होईल अशा स्वरूपाच्या कामांनाच प्राधान्य देणेत यावे.
10) सदर प्रकल्पांतर्गतची कामे संबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखड्याशी सुसंगतअसल्याची खातरजमा करावी.
11) सदर प्रकल्पांतर्गतच्या कामांना ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करणेत यावे.
12) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टांसाठी खर्च करणेत येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजुर कामावरच मंजुर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.
13) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणाऱ्या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.
14) निधी खर्च करताना तो विहित कार्यपद्धती अनुसरून सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहित प्रक्रियेचे अवलंबन करणेत यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करणेत आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

15) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरुस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

16) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरु करण्यापूर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photographs)काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

17) शासन निर्णय दि.28/03/2018 अन्वये त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

18) पायाभूत सुविधाअंतर्गतच्या कोणत्याही कामांची दुरुक्ती होणार नाही, याबाबतची दक्षता घेणेत यावी.

19) सदर प्रशासकीय मान्यता ही नगरपरिषद/ नगरपंचायत यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे देणेत येत आहे. नप/ नपंनीपुरविलेली माहिती चुकीची आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित नगरपरिषद/ नगरपंचायत यांची राहील.

20) सदर कामांसाठी योग्य त्या प्राधिकरणाची बांधकाम परवानगी घेऊनच कामे सुरु करावीत.

21)मा. उपायुक्त (नपप्र ), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडील पत्र क्र. नपा-संकलन3/बांधकाम/2022 दि.24/03/2022 चे पत्रानुसार रस्त्यांची कामे हाती घेणेपूर्वी pavement condition Index (PCI) काढणे व पत्रात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

(**डॉ. राजेन्द्र ब. भोसले** )
जिल्हाधिकारी, **अहमदनगर**

**प्रति**:- १)कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडेस आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

२) मुख्याधिकारी , पारनेर नगरपंचायत यांना माहितीस्तव

**प्रत**:- १) मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर

२)मा. विभागीयआयुक्त,नाशिकविभाग,नाशिक (नगरपालिकाशाखा) यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर